आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ डिसेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- २८८ नगरपरिषदा, आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु / बहुतांश ठिकाणी महायुतीतल्या पक्षांच्या उमेदवारांची सरशी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाममधे नामरूप इथं १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या खत प्रकल्पाचं भूमीपूजन

- रेल्वेची भाडेवाढ येत्या २६ डिसेंबर पासून लागू होणार

**आणि**

- १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु झाली आहे. तीन नगराध्यपदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या आहेत. मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांची गर्दी आहे.

बीडमधे मतमोजणीच्या वेळी गोंधळ उडाल्यामुळे पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला.

२ डिसेंबरला झालेल्या निवडणुकीत ६७ पूर्णांक ३ दशांश टक्के मतदान झालं तर २० डिसेंबरला झालेल्या टप्प्यात ४७ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदारांनी आपला कौल यंत्रात बंद केला, असं राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

मतमोजणीची अधिकृत आकडेवारी अद्याप आयोगाकडून मिळाली नाही. मात्र आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी स्थानिक निवडणुकीच्या निकालांच्या बातम्या दिल्या

आहेत. त्यानुसार बहुतांश ठिकाणी महायुतीतल्या पक्षांच्या उमेदवारांची सरशी झालेली दिसते. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ….

**- - - व्हॉईस कास्ट- -- -**

***(रत्नागिरी*** *जिल्ह्यातल्या रत्नागिरी, चिपळूण, खेड, राजापूर या चार नगर परिषदांमध्ये चार ठिकाणी शिवसेना, दोन ठिकाणी भाजप, तर एका ठिकाणी काँग्रेसला नगराध्यक्षपद मिळालं. खेड नगर परिषदेत नगराध्यक्षपदासह सर्वच्या सर्व २१ जागांवर महायुतीचा विजय झाला.*

***सिंधुदुर्गात*** *सावंतवाडी आणि वेंगुर्ल्यामध्ये भाजपच्या उमेदवारांनी नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. मालवणमध्ये शिवसेना तर कणकवलीत शहर विकास आघाडीचा नगराध्यक्ष झाला आहे.*

***रायगडमध्ये*** *अलिबाग इथं शेकापनं आपलं वर्चस्व अबाधित राखलं. तिथं शेकापच्या अक्षया नाईक विजयी झाल्या. पेण नगरपालिकेसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपच्या प्रितम पाटील विजयी झाल्या तर खोपोलीत आणि माथेरानमध्ये शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले. कर्जत मध्ये आघाडीच्या पुष्पा दगडे विजयी झाले आहेत..*

***लातूर*** *जिल्ह्यात अहमदपूर नगरपरिषदेत नराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपचे स्वप्निल व्हत्ते विजयी झाले. नगरसेवकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसनं १६ जागांवर विजय मिळवला. भाजप आणि काँग्रेसनं प्रत्येकी ३, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तसंच शिवसेनेनं प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला.*

*उदगीर आणि निलंग्यात भाजपानं, तर औसा इथं राष्ट्रवादीच्या उमेदवारानं नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली.*

***नाशिक****मध्येही नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. जिल्ह्यातल्या ११ नगरपालिकांपैकी भगूर नगरपालिकेत २७ वर्षांनी सत्तांतर झालं. तिथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रेरणा बलकवडे निवडून आल्या. येवला आणि सिन्नरच्या नगराध्यक्षपदीही राष्ट्रवादी काँग्रेसचाच उमेदवार निवडून आला.*

*चांदवडमध्ये भाजपानं नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली, तर इगतपुरीमध्ये शिवनेच्या शालिनी खातळे विजयी झाल्या.*

***अहिल्यानगर**मध्ये राहाता, देवळाली प्रवरा, पाथर्डी, शिर्डी, श्रीगोंदा, जामखेड, कोपरगावमध्ये भाजपानं नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. संगमनेरच्या नगराध्यक्षपदी शहर विकास आघाडीच्या डॉ. मैथिली तांबे विजयी झाल्या. श्रीरामपूरमध्ये काँग्रेस, तर शेवगाव आणि नेवासा इथं शिवसेनेच्या उमेदवारांनी बाजी मारली.*

***धुळ्यात** शिंदखेड्याचं नगराध्यक्षपद राष्ट्रवादीकडे आलं आहे.*

***नंदूरबार**मध्ये नवापूरच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराची निवड झाली.*

***सोलापूर** जिल्ह्यातल्या १२ नगरपरिषदांपैकी चार ठिकाणी भाजपा आणि ३ ठिकाणी शिवसेनेचा विजय झाला. तीर्थ क्षेत्र विकास आघाडीच्या उमेदवारांनी २ ठिकाणी विजय मिळवला. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षासह, स्थानिक आघाडीनं प्रत्येकी एका नगरपरिषदेवर सत्ता मिळविली.*

***छत्रपती संभाजीनगर**मध्ये सिल्लोड आणि पैठण इथं शिवसेनेच्या उमेदवारांनी विजय मिळवला, तर कन्नड आणि  खुलताबादमध्ये काँग्रेसचे नगराध्यक्ष झाले. राष्ट्रवादी काँग्रेसनं गंगापूर, भाजपानं वैजापूर तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं फुलंब्रीच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकली.*

***सांगली जिल्ह्यात** आटपाडी आणि 'जत' मध्ये भाजपाचे, शिराळा आणि विटा इथं शिवसेनेचे उमेदवार नगराध्यक्षपदी निवडून आले. तर ईश्वरपूर इथं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार, आष्ट्यात स्थानिक आघाडी, पलूसमध्ये काँग्रेस आणि तासगाव इथं स्वाभिमानी आघाडीचे उमेदवार निवडून आले.*

***नागपूर** मध्ये बेसा पिपळा, भिवापूर, बहादूरा या तीन ठिकाणी भाजपाचे उमेदावर नगराध्यक्ष म्हणून निवडून आले, तर मोहपा इथं काँग्रेसच्या उमेदवारानं बाजी मारली.)*

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदारांनी विरोधकांच्या खोट्या आरोपांना नाकारून महायुतीला जनादेश दिल्याचा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला आहे. राज्यात आज २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु असतानाच मुंबई इथल्या भाजप मुख्यालयात ते पत्रकारांशी बोलत होते. विरोधकांनी प्रचारादरम्यान अनेक आरोप केले, मात्र, मतदारांनी ते ओळखून त्यांना

नाकारल्याची प्रतिक्रिया चव्हाण यांनी यावेळी दिली. आता मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर सर्व लक्ष केंद्रित असेल, असंही ते यावेळी म्हणाले.

राज्यातल्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांमधे भाजपाला भरघोस यश मिळालं असून जनतेच्या विश्वासाचं हे निदर्शक आहे अशी प्रतिक्रीया विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केली आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या आसाम दौऱ्यावर असून या दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी त्यांच्या हस्ते नामरूप इथं १२ हजार कोटी रुपयांच्या अमोनिया युरिया खत प्रकल्पाचं भूमिपूजन झालं. या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी शहीद स्मारक क्षेत्र इथे अवैध स्थलांतरितांविरुद्धच्या आसाम आंदोलनातल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच त्यांनी ब्रह्मपुत्रा नदीतल्या बोटीवर स्थानिक शाळांमधल्या २५ विद्यार्थ्यांशी परीक्षा पे चर्चा केली.

<><><><>

रेल्वेने प्रवासभाडे आकारणीत बदल केले असून ते येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणार आहेत. यात सर्वसामान्य वर्गाच्या प्रवास भाड्यात २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापुढच्या सामान्य वर्गाच्या प्रवासाकरता प्रतिकिलोमीटर एक पैसा तर मेल - एक्सप्रेस गाड्यांसाठी प्रति किलोमीटर २ पैसे भाडेवाढ झाली आहे. ५०० किलोमीटर अंतराच्या प्रवासाकरता १० रुपये जास्त मोजावे लागतील.

उपनगरी गाड्याच्या प्रवासभाड्यात बदल केलेला नाही असं रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

७ लाख २६ हजार रुपयांचं मेफेड्रॉन जवळ बाळगल्याप्रकरणी ठाणे जिल्ह्यात एकाला अटक केली असल्याचं पोलिसांनी आज सांगितलं. हा आरोपी इंदौरचा रहिवासी असून शुक्रवारी उल्हासनगरमधे संशयास्पद स्थितीत फिरताना पोलिसांनी त्याला पकडलं. त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ ३६ पूर्णाक ३ दशांश ग्रॅम एमडी पावडर सापडली. इंदौरमधल्या हरीश नावाच्या व्यक्तीकडून हे अंमली पदार्थ येत असल्याचं चौकशीत समजलं.

त्याचा माग काढण्याचा प्रयत्न सुरु असून या संपूर्ण पुरवठा साखळीचा शोध घेत असल्याचं एका पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं.

<><><><>

भारत आणि पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघांमध्ये दुबई इथं आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना सुरु आहे. या सामन्यात पाकिस्ताननं भारतासमोर विजयासाठी ३४८ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर पाकिस्ताननं आपल्या डावाला वेगानं सुरुवात केली. भारतानंही चौथ्याच षटकात सलामीवीर हमझा याला बाद केलं. मात्र सलामीवीर समीर मीनहास यानं दमदार दीड शतकी खेळी करत, आधी दुसऱ्या गड्यासाठी उस्मान खान याच्यासोबत ९१, तर तिसऱ्या गड्यासाठी अहमद हुसेन याच्यासोबत १३७ धावांची भागिदारी केली. मीनहास १७२ धावा करून बाद झाला. त्यानंतर आलेल्या फलंदाजांना मात्र धावांचा वेग कायम राखता आला नाही, त्यामुळं भारतानं पाकिस्तानला निर्धारीत ५० षटकात ८ बाद ३४७ धावांवर रोखलं.

विजयासाठी ३४८ धावांचा पाठलाग करताना भारतानंही वेगवान सुरुवात केली आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तिसऱ्या षटकात भारताच्या बिनबाद ३२ धावा झाल्या होत्या.

<><><><>

भारत आणि श्रीलंका महिला क्रिकेट संघांदरम्यानच्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज विशाखापट्टणम इथं  होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता सामना सुरु होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीचा भाग म्हणून, श्रीलंकेविरुद्ध ५ टी-२० सामने खेळेल. पहिले दोन सामने विशाखापट्टणममध्ये, तर शेवटचे तीन सामने तिरुवनंतपुरममध्ये होणार आहेत.

<><><><>

आज ‘जागतिक ध्यान दिवस’ साजरा होत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने गेल्या वर्षी २१ डिसेंबर हा दिवस ‘जागतिक ध्यान दिन’ म्हणून घोषित केला होता. ‘ध्यान दिवस’, आत्मभान आणि आत्मशांतीचं प्रतीक आहे. या निमित्तानं, न्यूयॉर्क इथल्या संयुक्त

राष्ट्रांच्या मुख्यालयात ‘जागतिक शांती आणि सद्भावनेसाठी’, ‘ध्यान-साधना’ सत्र आयोजित करण्यात आलं होतं. यामध्ये योग प्रशिक्षकांबरोबर, जगभरातले राजनैतिक अधिकारी, आणि संयुक्त राष्ट्रांचे अधिकारी सहभागी झाले होते.

**//<><><><><>//**